## नियमीत दिवाणी मुकदमा नं.१९७/२०११ मधील

## निशाणी-७६, ७८ व ८० वरील एकत्रित आदेश

सदरचे अर्ज वादीने **प्रतिवादी क्र.१० – अंजनाबाई तुकाराम फणस** ह्या मयत झाल्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी, **प्रतिवादी क्र.१०** यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी व **प्रतिवादी क्र.१०** यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेले आहेत.

२. वादी यांचे कथन की, दाव्याचे कामकाज चालू असताना **प्रतिवादी क्र.१० – अंजनाबाई तुकाराम फणस ह्या दि.२४/०७/२०२०** रोजी मयत झालेल्या आहेत. वादी हे मुंबई येथे राहण्यास असुन त्या दरम्यान कोविड-१९ मुळे लॉकडाऊन असल्यामुळे व वादी हे कानदुखीमुळे व कानाच्या ऑपरेशनमुळे कोठेही बाहेर जात येत नव्हते, त्यामुळे **प्रतिवादी क्र.१०** मयत झाल्याबाबतची माहिती त्यांना नुकतीच कळाल्यामुळे **प्रतिवादी क्र.१०** यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झालेला आहे. सबब सदरचा विलंब माफ होऊन **प्रतिवादी क्र.१०** यांचे वारस अभिलेखावर घेण्यात यावे. वादीने कथनाच्या पृष्ठार्थ निशाणी-७७, ८९ व ८१ वर प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत. तसेच निशाणी-७५ च्या यादीसोबत **प्रतिवादी नं.१०** यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल केली आहे, ज्यानुसार **प्रतिवादी क्र.१० – अंजनाबाई तुकाराम फणस** ह्या **दि.२४/०७/२०२०** रोजी मयत झालेल्या असल्याचे दिसून येत आहे.

३. प्रतिवादी विधीज्ञांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असुन अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादी यांचे कथन की, वादी यांनी अर्जामध्ये कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नसुन कानाच्या ऑपरेशनबाबत देखील कोणतीही वैद्यकीय कागदपत्रे दाखल केलेली नाहीत तसेच विलंबाबात देखील सविस्तर नमुद न केल्यामुळे सदरचे अर्ज नामंजूर करावे असे नमुद केले आहे. तसेच यदाकदाचित अर्ज मंजुर

करावे असा न्यायालयाचा अभिप्राय झाल्यास वादी यांनी प्रतिवादी यांना जास्तीत जास्त कॉस्ट देणेबाबत हुकूम करणेत यावा.

४. वादीने सदरचे अर्ज **दि.३०/११/२०२२** रोजी दाखल केलेले आहेत. अर्ज ९० दिवसांच्या आत दाखल न झाल्याने **प्रतिवादी क्र.१०** यांचेविरुध्द दावा अबेट झालेला आहे. सदर दावा साठेखतावरुन खेरदीखत करुन मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठीचा आहे. वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक आहे. तसेच सदरील दाव्याचे स्वरुप पाहता व दावा पुर्ण गुणदोषावर निर्णयीत करण्यासाठी सदरील दाव्यामध्ये मयत **प्रतिवादी क्र.१० – अंजनाबाई तुकाराम फणस** यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे, परंतु अर्ज करण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी यांचे झालेले नुकसान देखील नजरअंदाज करुन चालणार नाही. त्यामुळे सदरील अर्ज हे योग्य दंड लावून मंजूर करणे न्यायाचे ठरले. कारणे आदेश :-

## आदेश

(१) अर्ज रक्कम **रु.३००/-** च्या दंडासह मंजूर करणेत येत आहेत.

(२) दंडाची रक्कम वादी यांनी प्रतिवादी यांना पुढील तारखेपर्यंत दिल्यानंतर दाव्यात दुरुस्ती करुन **प्रतिवादी क्र.१० – अंजनाबाई तुकाराम फणस** यांचे वारस अभिलेखावर घ्यावेत.

सही/-XXX

दिनांक : ०९/०१/२०२३. (श्री. एम. एस. भरड)

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.